**सोलापूर महानगरपालिका**

जा.क्र.सआस/ता.भरती जाहि./आस्था-२/४२७
सामान्य प्रशासन विभाग,
सोलापूर दि.१२/०६/२०२३

प्रति,
१) कामगार कल्याण व जनता संपर्क अधिकारी
२) संगणक प्रोग्रामर,

**विषय :-** जाहीर प्रसिध्दीकरण करणेबाबत...

सोलापूर महानगरपालिकेच्या म.गांधी प्राणी संग्रहालयाकरीता प्राणी संग्रहालय संचालक, पशु वैद्यकिय अधिकारी, व ॲनिमल किपर या पदावर सदर पदाचे शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून थेट मुलाखतीव्दारे निवड करणेकामी माननियांनी जाहिर प्रसिध्दिकरण करण्यास मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सोबत जोडण्यात आलेले जाहीर प्रसिध्दीकरण जादा खप असणाऱ्या दोन वृत्तपत्रातून एक वेळ प्रसिध्द करणेत यावेत.

संगणक प्रोग्रामर यांनी सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण, विहित अटी व शर्ती सोबत जोडणेत आलेल्या असून त्या म.न.पा. संकेतस्थळावर प्रसिध्द करणेची कार्यवाही करावी.

12.06.23

(पुष्पगंधा भगत)
**सहाय्यक आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका**

आवक .क्रं307 दि.13/6/2023
संगणक विभाग

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३ ००१.

दूरध्वनी ०२१७- ०२७४०३००

( सामान्य प्रशासन विभाग, ईमेल :- smcgados2@gmail.com )


जा.क्र.सआस/Zoo/जाहिरात/आस्था-२/४१७ सोलापूर दि.१७/०६/२०२३ E-27821

## -: जाहीर प्रसिध्दिकरण :-

## WALK - IN- INTERVIEW

**दि.20/06/२०२३, वेळ :- ११:३० वाजतां**

**( अर्ज स्विकारण्याची वेळ :- सकाळी०८:३० ते ११:००)**

**स्थळ :- सामान्य प्रशासन विभाग, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.**

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभाग अंतर्गत प्राणी संग्रहालयाकडील खालील नमूद पदाकरीता पदासमोर दर्शविलेल्या शैक्षणिक पात्रता धारण करणा-या पात्र उमेदवारांकडून / सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारीकडून अर्ज मागवून Walk - in-Interview व्दारे केवळ तात्पुरत्या स्वरुपात **सहा महिन्याच्या** कालावधी करीता शर्ती व अटीवर भरण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | मानधन प्रति महिना. |
|---|---|---|---|---|
| १ | प्राणी संग्रहायल संचालक | १ | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची पशु वैद्यकिय शास्त्रातील पदव्युत्तर पदवी (एम.व्हि.एस.सी.)<br>• प्राणी संग्रहालयाशी संबंधीत कामाचा ५ वर्षाचा अनुभव धारकास प्राधान्य | र.रू. ४५,०००/- प्र.म. अशी असून योग्य उमेदवार भेटल्यास मानधनामध्ये वाटाघाटी करण्यात येईल. |
| २ | पशु वैद्यकिय अधिकारी | १ | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची पशु वैद्यकिय शास्त्रातील पदव्युत्तर पदव्युत्तर पदवी<br>• पशु वैद्यकिय अधिकारी पशु शल्य चिकित्सक म्हणून शासकीय/ निमशासकीय/स्था.स.संस्थामध्ये किमान ०३ वर्षाचा अनुभव धारकास प्राधान्य. | र.रू. ३०,०००/- प्र.म. अशी असून योग्य उमेदवार भेटल्यास मानधनामध्ये वाटाघाटी करण्यात येईल. |
| ३ | ॲनिमल किपर | १ | • मान्यताप्राप्त विद्यापिठाची पशु संवर्धनाची पदविका आवश्यक<br>• अनुभव धारकास प्राधान्य | र.र.१२,०००/-प्र.म. |

**शर्ती व अटी :-**

१. मा.शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही - २०१०/प्र.क्र.१७/२०००/१२ दि.१ जुलै २००५ नुसार कुंटुंबांची अट लागू असून त्यानुसार दि.२८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असू नये. सदर नियमाचे प्रतिज्ञा पत्र नमुना 'अ' नुसार उमेदवारांने सादर करावयाचे आहे.

२. सदरची नियुक्ती ही केवळ तात्पुरत्या स्वरूपात व एकवट मानधनावर असून पुर्णवेळ काम करण्याच्या अटीवर राहिल.

३. संबंधीत उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी पोलीस यंत्रणेमार्फत करून घेण्यात येईल. सदर पडताळणीमध्ये उमेदवार दोषी आढळल्यास त्यांची तात्काळ सेवा समाप्त करण्यात येईल.

४. इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी त्यांचे संपूर्ण परिचयपत्र, सर्व आवश्यक कागदपत्रांच्या एक सांक्षांकित प्रती, पासपोर्ट साईज फोटो व मुळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतीसह वरील तारखेस दिलेल्या वेळेत उमेदवारांनी मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहणेचे आहे.

५. उपरोक्त पदभरती ही केवळ कामकाजाच्या सोयीकरीता व तात्पुरत्या स्वरूपात करण्यात आलेली असल्याने पदभरतीमधील उमेदवारांना कायम सेवकांप्रमाणे कोणतेही लाभ लागू राहणार नाही.

६. वर नमूद शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी ही अर्ज करू शकतील.

७. स्थानिक परिस्थितीनुसार शर्ती व अटी बाबत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील

८. कोणतेही कारण न देता निवड प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे/रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहतील.

९. नियुक्तीसाठी कसल्याही प्रकारचा दबाव/गैरमार्गाचा अवलंब केल्यास उमेदवारी कोणत्याही टप्पावर कसलीही कल्पना न देता रद्द करण्यात येईल व त्याबद्दल कसलीही तक्रार करता येणार नाही.

१०. सदरची नियुक्ती ही केवळ ठराविक कालावधी करीता व नमूद एकवट मानधनावर तात्पुरत्या स्वरूपाचे असल्याने नियुक्ती पूर्वी रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर सर्व शर्ती व अटी मान्य असलेबाबत सद्सद् विवेकबुध्दीने प्रतिज्ञापत्र करुन दयावे लागेल.

११. इच्छुक उमेदवारांनी सदर दिवशी सकाळी ते या वेळेत अर्ज सादर करावा. कागदपत्राची पडताळणी करण्यासाठी सोबत मूळ कागदपत्रे आणावी.

Signed by Sheetal Teli
-ugale
Date: 08-06-2023 13:08:15

( शीतल तेली-उगले, भा.प्र.से.)
**आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका**